0001

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वीचा :-

१) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक ०१/१२/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) वरीष्ठ पोलिस निरीक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २९/११/२०१२ रोजी या कार्यालयास प्राप्त झालेले पत्र.

३) या कार्यालयाचे दिनांक ०३/१२/२०१२ रोजीचे पत्र.

४) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७८/२०१२/जा.क्र.[illegible], दिनांक ०३/१२/२०१२, १९/१२/२०१२ व ०२/०१/२०१३.

५) पोलिस निरिक्षक (गुन्हे), नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक १८/१२/२०१२ रोजी या कार्यालयास प्राप्त अभिवेदन.

६) मे. आय.ओ.सी. कंपनीचे सिनियर टर्मीनल मॅनेजर श्री. हर्षवर्धन गुप्ता व मे. आय.ओ.सी. कंपनीचे डेप्युटी मॅनेजर श्री. आर. निलकंटन यांचे दिनांक १८/१२/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

७) टँकर क्र. एमएच-०४-बीयू-९३६५ टँकर मालक व चालक सुर्यलाल बिहारीलाल यादव, टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ तथा राहत बल्क कॅरीअर्सचे मालक राहत हुसेन खान, टँकर क्र.एमएच-०४-एएल-३२५४ चा मालक रामचंद्र रामसुमेर यादव यांचे दिनांक १८/१२/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

८) विठ्ठल तुकाराम सावंत, प्रविण जनार्दन धनू, कृष्णकुमार भिकाजी परब, रामचंद्र गोविंद गवस, एकनाथ पांडूरंग परब, एल. जे. निर्भवणे व बाळासाहेब जनार्दन आवारे या मे. आय.ओ.सी. कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे संयुक्त लेखी निवेदन.

९) टँकर क्र. एमएच-०४-बीयु-९३६५ या टँकरमधील साठ्याचा दिनांक ०५/०१/२०१३ रोजीचा मोजदाद पंचनामा.

१०) टँकर क्र. एमएच-४३-ई-५७९४ व एमएच-०४-सीए-५७०७ या टँकरमधील साठ्याचा दिनांक १५/०१/२०१३ रोजीचा मोजदाद पंचनामा.

११) टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ चा चालक रामवृक्ष सोमई मौर्या, टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ तथा राहत बल्क कॅरीअर्सचे मालक राहत हुसेन खान व टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ चा वाहतुकदार तथा राहत बल्क कॅरीअर्सचे मालक राहत हुसेन खान यांचे दिनांक १६/०१/२०१३ रोजीचे एकत्रित लेखी निवेदन.

१२) टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ चा चालक सुरेशकुमार रामशरण यादव व टँकर क्र.एमएच-०४-एएल-३२५४ चा मालक तथा मे. साई रोडवेसचे मालक रामसुमेर यादव यांचे दिनांक १६/०१/२०१३ रोजीचे संयुक्त लेखी निवेदन.

१३) टँकर क्र. एमएच-०४-सीए-५७०७ चा चालक भोला महंगू गुप्ता व टँकर क्र. एमएच-०४-सीए-५७०७ या टँकरचा तथा शायनी शिपींग ॲन्ड लॉजिस्टिक प्रा.लि. चा मालक यांचे दिनांक १६/०१/२०१३ रोजीचे संयुक्त लेखी निवेदन.

१४) टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६, एमएच-०४-एएल-३२५४ व एमएच-४३-ई-५८२१ या टँकरमधील साठ्याचा दिनांक ३१/०१/२०१३ रोजीचा मोजदाद पंचनामा.

१५) पोलिस निरिक्षक (गुन्हे), नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २६/०२/२०१३ रोजी या कार्यालयास प्राप्त अभिवेदन.

0002

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७८/२०१२/जा. २१०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : १५/०३/२०१३.

आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक २४/११/२०१२ रोजी या कार्यालयास इंडियन ऑईल कंपनी, वाशी टर्मीनस या कंपनीमध्ये पेट्रोल/डिझेलचे टँकरमध्ये चलनामध्ये नमूद साठ्यापेक्षा अधिक प्रमाणात पेट्रोल/डिझेल भरुन दिले जात असून अधिकचे दिलेले पेट्रोल/डिझेल सदरचे टँकर चालक अनधिकृतरित्या बाहेरील व्यक्तीस विक्री करीत असल्याबाबत मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयाच्या अधिपत्त्याखालील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी हे पंचांसह उक्त ठिकाणी पोहचले. सदर ठिकाणी अधिकाऱ्यांना इंडियन ऑईल कंपनी, वाशी टर्मीनस कंपनीतून टँकर क्र. एमएच-०४-बीयू-९३६५, एमएच-४६-एफ-७७८६, एमएच-४३-ई-५८२१ व एमएच-४३-ई-५७९४ या चार गाड्या भरुन निघालेले व गेट बाहेर संशयीतरित्या उभे असल्याचे दिसून आले. अधिकाऱ्यांनी सदरच्या टँकर चालकांकडे चौकशी केली असता, टँकर क्र. एमएच-०४-बीयू-९३६५ व एमएच-४६-एफ-७७८६ च्या टँकर चालकांनी चलने दाखवली. सदरच्या चलनाची अधिकारी वर्ग पहाणी करीत असताना, टँकर क्र. एमएच-४३-ई-५८२१ व एमएच-४३-ई-५७९४ चे चालक टँकरची केबीन बंद करुन पळून गेले. अधिकाऱ्यांनी टँकर क्र. एमएच-०४-बीयू-९३६५ व एमएच-४६-एफ-७७८६ या दोन टँकरची चलने ताब्यात घेवून त्यांना पुढील तपास होईपर्यंत टँकर उभे करुन ठेवण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर अधिकारी वर्ग यांनी पंचासमवेत तेल कंपनीच्या मुख्य गेटमधून आतमध्ये प्रवेश केला असता, तेथील सुरक्षा रक्षकांनी हटकले असता अधिकाऱ्यांनी त्यांच्या व पंचाच्या ओळखी करुन देऊन कंपनीमध्ये येण्याचे प्रयोजन सांगीतले. त्यानंतर सुरक्षा रक्षकांनी गेटवरील रजिस्टरमध्ये रितसर नोंदी घेऊन तेल कंपनीचे डेप्युटी मॅनेजर श्री. आर. निलकंटन यांचेकडे पथकास घेऊन गेले. अधिकाऱ्यांनी त्यांना वरील टँकरमध्ये साठा भरुन दिल्याचा तपशिल व त्यांच्या रेकॉर्डवरील नोंदी तपासावयाच्या तसेच टँकरमधील साठयाचे मोजमाप करावयाचे असून सहकार्य करण्याची विनंती केली. त्यानुसार त्यांनी त्यास होकार दिला व रेकॉर्ड सादर

0003
केले व कंपनीच्या गेटच्या बाहेरील बाजूस उभे असलेले टँकरमधील साठ्याची मोजदाद करण्यासाठी सदरहू टँकर कंपनीच्या आवारात आणण्यास परवानगी देऊन सुरक्षा रक्षकांना तशा सुचना दिल्या. त्यानुसार अधिकाऱ्यांनी टँकर क्र. एमएच-०४-बीयू-९३६५ हा टँकर बाहेरुन कंपनीच्या आवारात आणून टँकरमधील डिझेल साठयाची मोजदाद करण्यासाठी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सदर टँकर चेकिंग पॉईंटवर उभा करण्याच्या टँकर मालकास सुचना दिल्या. तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष तसेच तेल कंपनीचे अधिकारी श्री. आर. निलकंटन व टँकर मालक यांच्यासमवेत व समक्ष सदर टँकरमधील डिझेल साठ्याची प्रत्यक्ष मोजदाद करण्यात आली. सदर टँकर सिलबंद स्थितीत असल्याचा आढळला. टँकरमधील प्रत्यक्ष मोजदाद केलेला डिझेलचा साठा कप्पानिहाय पुढीलप्रमाणे असल्याचे आढळून आले.

कप्पा क्र.	पदार्थ	कॅलीब्रेशन चार्ट प्रमाणे त्या कप्प्यासाठी असलेले डिप रॉडचे रीडिंग	चलन क्रमांक ६५८६३७६६८ नुसार साठा	अतिरिक्त आढळून आलेले रिडींग	कप्प्यामधील आढळून आलेला साठा	अतिरिक्त आढळलेला साठा
कप्पा क्र.१	डिझेल	१३४.७	३००० लि.	+ ३ मी.मी.	३००६.६८० लि.	६.६८० लि.
कप्पा क्र.२	डिझेल	१२७.५	३००० लि.	+ ३ मी.मी.	३००७.०५० लि.	७.०५० लि.
कप्पा क्र.३	डिझेल	१२९	३००० लि.	+ ३ मी.मी.	३००६.९७० लि.	६.९७० लि.
कप्पा क्र.४	डिझेल	१२१	३००० लि.	+ १२ मी.मी.	३०२९.७५० लि.	२९.७५० लि.
एकूण	डिझेल		१२००० लि.		१२०५०.४५० लि	५०.४५० लि.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष व इंडियन ऑईल कार्पोरेशनचे डेप्युटी मॅनेजर श्री. आर. निलकंटन व रामदास सोमई मौर्या एमएच-४६-एफ-७७८६ हा टँकर बाहेरुन कंपनीच्या आवारात आणून टँकरचा चालक यांचे समक्ष सदर टँकरमधील डिझेल साठयाची पंचासमक्ष प्रत्यक्ष मोजदाद करण्यात आली. टँकर सिलबंद स्थितीत असल्याचा आढळला. टँकरमधील प्रत्यक्ष मोजदाद केलेला डिझेलचा साठा कप्पानिहाय पुढीलप्रमाणे असल्याचे आढळून आले.

कप्पा क्र.	पदार्थ	कॅलीब्रेशन चार्ट प्रमाणे त्या कप्प्यासाठी असलेले डिप रॉडचे रीडिंग	चलन क्रमांक ६५८६३२३४९ नुसार साठा	अतिरिक्त आढळून आलेले रिडींग	कप्प्यामधील आढळून आलेला साठा	अतिरिक्त आढळलेला साठा
कप्पा क्र.१	डिझेल	१२६.४	३००० लि.	+ ४ मी.मी.	३००९.४९० लि.	९.४९० लि.
कप्पा क्र.२	डिझेल	१३२.२	३००० लि.	+ २ मी.मी.	३००४.५३० लि.	४.५३० लि.
कप्पा क्र.३	डिझेल	१२९	३००० लि.	+ ४ मी.मी.	३००९.३०० लि.	९.३०० लि.
कप्पा क्र.४	डिझेल	१३१.३	३००० लि.	+ ३ मी.मी.	३००६.८५० लि.	६.८५० लि.
एकूण	डिझेल		१२००० लि.		१२०३०.१७० लि	३०.१७० लि

0004

त्यानंतर अधिकाऱ्यांनी तेल कंपनीच्या आवारामध्ये फिलींग पॉईंटवरुन नुकतेच भरुन कंपनीमधून निघत असताना इंडियन ऑईल कार्पोरेशनचे प्रतिनीधी श्री. आर. निलकंटन, डेप्युटी मॅनेजर यांना सदर टँकरची तपासणी करावयाची आहे असे सांगून त्यांचे व पंचाचे आणि भोला महंगू गुप्ता टँकर क्र. एमएच-०४-सीए-५७०७ या टँकरचा चालक यांचे समवेत सदर टँकरमधील डिझेल साठयाची प्रत्यक्ष मोजदाद करण्यात आली. टँकर सिलबंद स्थितीत असल्याचा आढळला. टँकरमधील प्रत्यक्ष मोजदाद केलेला डिझेलचा साठा कप्पानिहाय पुढीलप्रमाणे असल्याचे आढळून आले.

कप्पा क्र.	पदार्थ	कॅलीब्रेशन चार्ट प्रमाणे त्या कप्प्यासाठी असलेले डिप रॉडचे रीडिंग	चलन क्रमांक ६५८६३८७६८ नुसार साठा	अतिरिक्त आढळून आलेले रिडींग	कप्प्यामधील आढळून आलेला साठा	अतिरिक्त आढळलेला साठा
कप्पा क्र.१	डिझेल	१३०.९	४००० लि.	+ ५ मी.मी.	४०१५.२०० लि.	१५.२०० लि.
कप्पा क्र.२	डिझेल	१३१.३	४००० लि.	+ ८ मी.मी.	४०२४.३७० लि.	२४.३७० लि.
कप्पा क्र.३	डिझेल	१३२.६	४००० लि.	+ १० मी.मी.	४०३०.१६० लि.	३०.१६० लि.
एकूण	डिझेल		१२००० लि.		१२०६९.७३० लि	६९.७३० लि.

तसेच तेल कंपनीच्या आवारामध्ये फिलींग पॉईंटवरुन नुकतेच भरुन कंपनीमधून दुसरा टँकर निघत असताना इंडियन ऑईल कार्पोरेशनचे प्रतिनीधी श्री. आर. निलकंटन, डेप्युटी मॅनेजर यांना सदर टँकरची तपासणी करावयाची आहे असे सांगून त्यांचे व पंचाचे आणि सुरेशकुमार रामशरण यादव टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ या टँकरचा चालक यांचे समवेत सदर टँकरमधील डिझेल साठयाची पंचासमक्ष प्रत्यक्ष मोजदाद करण्यात आली. टँकर सिलबंद स्थितीत असल्याचा आढळला. टँकरमधील प्रत्यक्ष मोजदाद केलेला डिझेलचा साठा कप्पानिहाय पुढीलप्रमाणे असल्याचे आढळून आले.

कप्पा क्र.	पदार्थ	कॅलीब्रेशन चार्ट प्रमाणे त्या कप्प्यासाठी असलेले डिप रॉडचे रीडिंग	चलन क्रमांक ६५८६४१६२८ नुसार साठा	अतिरिक्त आढळून आलेले रिडींग	कप्प्यामधील आढळून आलेला साठा	अतिरिक्त आढळलेला साठा
कप्पा क्र.१	पेट्रोल	११८.७	३००० लि.	+ ५ मी.मी.	३०१२.६३० लि.	१२.६३० लि.
कप्पा क्र.२	डिझेल	१२०.१	३००० लि.	-	३००० लि.	-
कप्पा क्र.३	डिझेल	१२०.६	३००० लि.	+ ३ मी.मी.	३००७.४६० लि.	७.४६० लि.
कप्पा क्र.४	डिझेल	११३	३००० लि.	+ ३ मी.मी.	३००७.९६० लि.	७.९६० लि.
एकूण	डिझेल		१२००० लि.		१२०२८.०५० लि	२८.०५० लि.

त्यानंतर टँकर क्र. एमएच-४३-ई-५८२१ व एमएच-४३-ई-५७९४ चे चालक टँकरची केबीन बंद करुन पळून गेल्याने सदरचे दोन्ही टँकरमधील साठयाची मोजदाद करणे आवश्यक असल्याने दोन्ही टँकर कंपनीच्या आतमध्ये घेणेबाबत डेप्युटी मॅनेजरना केलेल्या विनंतीनुसार त्यांनी सदर टँकर चालकांना टँकर कंपनीमध्ये

0005 घेण्याकरीता वारंवार उद्घोषकावरुन पुकारुनही कोणीही उपस्थित न झाल्याने त्यांनी सदर टँकरचे वाहतुकदारांशी भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधूनही सदर टँकरचे वाहतुकदार प्रतीसाद देत नसल्याचे डेप्युटी मॅनेजर श्री. आर. निलकंटन यांनी पंचासमक्ष अधिकाऱ्यांना सांगीतले. त्यामुळे अधिकाऱ्यांनी सदरचे टँकर कंपनीच्या आवारात घेऊन त्यांची तपासणी करणे आवश्यक असल्याने संबंधीत पोलिस स्टेशनला वर्दी दिली. त्यानुसार नेरुळ पोलिस स्टेशनचे श्री. एम.बी. राऊत, पोलिस कॉन्स्टेबल, क्र. २९६१ व श्री. अशोक एस. पानसरे, पोलिस कॉन्स्टेबल, क्र.१३१५ हे घटनास्थळी हजर झाले. दरम्यानच्या कालावधीत घटनास्थळी उपस्थित व्यक्तीने तो वरील टँकरचे वाहतुकदार सलमान ट्रान्सपोर्टचा प्रतिनीधी असल्याचे सांगून त्यांचे दोन्ही टँकरचे चालक व क्लिनर फरार झाले असून टँकरच्या केबीनच्या चाव्या त्या चालकांकडे असल्याचे सांगीतले व टँकरचे केबीनचे कुलूपे तोडून टँकर आत घेण्यास ते तयार असल्याचे सांगीतले व टँकर क्र.एमएच-४३-ई-५८२१ चे कुलूप पोलिस व पंचांसमक्ष तोडून सदरचा टँकर तपासणीसांठी कंपनीमध्ये इतर टँकरच्या चालकाच्या सहाय्याने कंपनीच्या आवारात घेऊन आले. तद्नंतर सदर टँकरच्या मालकाने सुरु असलेली कारवाई पाहून अंधाराचा फायदा घेऊन तो घटनास्थळावरुन पळून गेला. त्यामुळे अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष व इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे डेप्युटी मॅनेजर श्री. आर. निलकंटन यांचे समक्ष सदर टँकरमधील डिझेल साठयाची प्रत्यक्ष मोजदाद केली असता टँकर सिलबंद स्थितीत असल्याचा आढळला. टँकरमधील प्रत्यक्ष मोजदाद केलेला डिझेलचा साठा कप्पानिहाय पुढीलप्रमाणे असल्याचे आढळून आले.

कप्पा क्र.	पदार्थ	कॅलीब्रेशन चार्ट प्रमाणे त्या कप्प्यासाठी असलेले डिप रॉडचे रीडिंग	चलन क्रमांक ६५८६३२६९७ नुसार साठा	अतिरिक्त आढळून आलेले रिडींग	कप्प्यामधील आढळून आलेला साठा	अतिरिक्त आढळलेला साठा
कप्पा क्र.१	डिझेल	१२४.५	३००० लि.	+ २ मी.मी.	३००४.८१० लि.	४.८१० लि.
कप्पा क्र.२	डिझेल	१२५.३	३००० लि.	+ २ मी.मी.	३००४.७८० लि.	४.७८० लि.
कप्पा क्र.३	डिझेल	१२४.१	३००० लि.	+ २ मी.मी.	३००४.८३० लि.	४.८३० लि.
कप्पा क्र.४	डिझेल	१२२.६	३००० लि.	+ ६० मी.मी.	३१४६.८२० लि.	१४६.८२० लि.
एकूण	डिझेल		१२००० लि.		१२१६१.२४० लि	१६१.२४० लि

त्यानंतर इतर टँकरच्या चालकाच्या मदतीने कंपनीच्या बाहेर उभा असलेला दुसरा टँकर क्र. एमएच-४३-ई-५७९४ हा कंपनीच्या आवारात आणून त्याची अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष व इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे डेप्युटी मॅनेजर श्री. आर. निलकंटन यांचे समक्ष सदर टँकरमधील डिझेल साठयाची प्रत्यक्ष मोजदाद केली असता टँकर सिलबंद स्थितीत असल्याचा आढळला. टँकरमधील प्रत्यक्ष मोजदाद केलेला डिझेलचा साठा कप्पानिहाय पुढीलप्रमाणे असल्याचे आढळून आले. तसेच दोन्ही टँकरची अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष झडती घेतली असता, टँकरमध्ये दोन्ही गाड्यांची चलने आढळून आली.

कप्पा क्र.	पदार्थ	कॅलीब्रेशन चार्ट प्रमाणे त्या कप्प्यासाठी असलेले डिप रॉडचे रीडिंग	चलन क्रमांक ६५८६३४७२५ नुसार साठा	अतिरिक्त आढळून आलेले रिडींग	कप्प्यामधील आढळून आलेला साठा	अतिरिक्त आढळलेला साठा
कप्पा क्र.१	डिझेल	११७.९	३००० लि.	+ ५ मी.मी.	३०१२.७२० लि.	१२.७२० लि.
कप्पा क्र.२	डिझेल	१२१.७	३००० लि.	+ ५ मी.मी.	३०१२.३२० लि.	१२.३२० लि.
कप्पा क्र.३	डिझेल	१२०.७	३००० लि.	+ ४० मी.मी.	३०९९.४२० लि.	९९.४२० लि.
कप्पा क्र.४	डिझेल	११४.२	३००० लि.	+ ६ मी.मी.	३०१५.७६० लि.	१५.७६० लि.
एकूण	डिझेल		१२००० लि.		१२१४०.२२० लि	१४०.२२० लि

वरील प्रमाणे आढळून आलेल्या तफावतीबाबत उपस्थित टँकरचे मालक/चालक सुर्यलाल बिहारीलाल यादव, भोला महंगू गुप्ता, सुरेशकुमार रामशरण यादव व रामवृक्ष सोमई मौर्या यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी अधिकाऱ्यांना पंचासमक्ष असे सांगितले की, इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या आज रोजीच्या चलनावर १२ कि.लि. इतका पेट्रोल/डिझेलचा साठा नमूद असताना टँकरमध्ये अतिरिक्त साठा आढळून आला हे त्यांना मान्य असून ते इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या कर्मचाऱ्यांना टँकरमध्ये अतिरिक्त पेट्रोल/डिझेल साठा भरुन घेण्यासाठी नेहमी रुपये १००/- देत असतात. त्याप्रमाणे आजही इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या कर्मचाऱ्यांना रुपये १००/- देऊन अतिरिक्त साठा त्यांच्या टँकरमध्ये भरुन घेतलेला आहे. पेट्रोल/डिझेलचा अतिरिक्त साठा टँकरमध्ये भरुन घेण्यासाठी इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या पैसे दिलेल्या कर्मचाऱ्यांची नावे त्यांना माहित नसल्याचे व टँकरमध्ये भरलेला अतिरिक्त साठा टँकरमधून काढून सदर साठ्याची ते अनधिकृतरित्या डिझेल/पेट्रोलचा चोरीचा व्यवसाय करणाऱ्या अनधीकृत व्यक्तीना विक्री करत असल्याचे पंचासमक्ष अधिकाऱ्यांना सांगीतले.

तदनंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष इंडियन ऑईल कॉर्पोरेशन कंपनीचे उपरोक्त नमुद टँकर भरुन देण्याऱ्या फिलींग पॉईंट वरील अधिकारी व त्यांचे चार सहकाऱ्यांचे तसेच प्रत्यक्ष मोजदाद करतेवेळी उपस्थित असलेले डेप्युटी मॅनेजर श्री. आर. निलकंटन आणि टर्मीनल मॅनेजर यांचेकडे वरील प्रकाराबाबत विचारणा करुन त्यांचे जबाब नोंदविण्यात आले असता, टर्मीनल मॅनेजर श्री. हर्षवर्धन गुप्ता यांनी असे सांगितले की, सदर कंपनीमध्ये होणाऱ्या कामकाजावर त्यांचे पर्यवेक्षण आहे. सदर कंपनीमध्ये एकूण १५ फिलींग पॉईंट असून त्यापैकी यापूर्वी वेट ॲण्ड मेजरमेंटच्या अधिकाऱ्यांनी ४ फिलींग पॉईंट सीलबंद केले असून सदर सीलबंद असलेले फिलींग पॉईंटचे सील त्यांनी वैध मापन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या संमतीनुसार स्वत: तोडले असल्याचे सांगून संमती पत्राच्या पुराव्या दाखल त्यांनी संबंधीत विभागाकडे केलेल्या अर्जाच्या स्थळप्रतीवर वैध मापन निरिक्षकाचा शेरा नमुद असलेली छायांकित प्रत सादर केली. सदर बाबत नियंत्रक वैध मापन शास्त्र या विभागाकडे अधिक विचारणा करणार असल्याचे अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सांगीतले. सद्य:स्थितीत ११ फिलींग पॉईंट वरुन सुपरवायजरच्या

0007

नियंत्रणात टँकरमध्ये पेट्रोल/डिझेल भरुन दिले जाते. प्रत्येक टँकरची मोजदाद संगणकीय मीटर रिडींग तसेच डिप रॉड नुसार करण्याचे काम सुपरवायजर करीत असतात. तसेच सुपरवायजर श्री. सावंत यांनी त्यांच्या जबाबामध्ये वरील बाब मान्य केलेली आहे. तथापी श्री. हर्षवर्धन गुप्ता यांनी निवेदनावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला. परंतू टर्मिनलचे कामकाजावर संपूर्ण नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी टर्मिनल मॅनेजर श्री. हर्षवर्धन गुप्ता यांची असताना त्यांनी त्यांच्या पर्यवेक्षिय कामकाजात अक्षम्य निष्काळजीपणा केल्याचे निष्पन्न होते.

अधिकाऱ्यांनी वरील ६ टँकरची मोजदाद कंपनीच्या प्रशिक्षीत व जबाबदार अशा डेप्युटी मॅनेजर श्री. आर. निलकंटन यांचे तसेच उपस्थित टँकरच्या चालकांचे समक्ष केलेले असून त्यामध्ये प्रत्येक टँकरमध्ये अतिरिक्त साठा आढळून आलेला आहे. तथापि, टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ मधील कप्पा क्र. २ मध्ये मात्र साठा बरोबर आढळलेला असून इतर सर्व टँकरच्या सर्व कप्प्यांमध्ये साठा जादा आढळून आलेला असल्याने सदरची बाब संशयास्पद असल्याचे स्पष्ट होत असल्याने तसेच टँकर क्र. एमएच-४३-ई-५८२१ व एमएच-४३-ई-५७९४ चे चालक, क्लिनर घटनास्थळावरुन फरार झाल्याने आणि सदरहू टँकरचे वाहतुकदार घटनास्थळावर येऊन सुरु असलेल्या कारवाईचा अंदाज घेऊन तेही पळून गेल्याने बातमीत तथ्य असल्याचे सकृतदर्शनी सिध्द होत असल्याने अधिकाऱ्यांनी उपरोक्त सहाही टँकरमधील अनधिकृतरित्या साठा जादा भरुन घेऊन तो काळ्याबाजारात विक्री करीत असल्याच्या संशयास वाव मिळत असल्याने सदरचे टँकर जागीच ताब्यात घेऊन घटनास्थळीच जप्त केले.

सदर टँकर कंपनीमधून नुकतेच भरुन निघालेले/निघत असल्याने साठ्याच्या गुणवत्तेवर संशय येण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याने साठ्याचे नमुने घेण्यात आलेले नाहीत.

घटनास्थळी जप्त केलेल्या मुद्देमालाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	जप्त मुद्देमाल तपशिल	नग / साठा	जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये)
१	एमएच-०४-बीयू-९३६५	१ नग	१८,००,०००/-
२	उक्त टँकरमधील जप्त डिझेलचा साठा	१२०५०.४५० लि.	६,७४,८२५/-
३	एमएच-४६-एफ-७७८६	१ नग	१८,००,०००/-
४	उक्त टँकरमधील जप्त डिझेलचा साठा	१२०३०.१७० लि.	६,७३,६८९/-
५	एमएच-०४-सीए-५७०७	१ नग	१८,००,०००/-
६	उक्त टँकरमधील जपत डिझेलचा साठा	१२०६९.७३० लि.	६,७५,९०४/-
७	एमएच-०४-एएल-३२५४	१ नग	१८,००,०००/-
८	उक्त टँकरमधील जप्त पेट्रोलचा साठा	३०१२.६३० लि.	२,२५,९४७/-
९	उक्त टँकरमधील जप्त डिझेलचा साठा	९०१५.४२० लि.	५,०४,८६३/-
१०	एमएच-४३-ई-५८२१	१ नग	१८,००,०००/-

११	उक्त टॅकरमधील जप्त डिझेलचा साठा	१२१६१.२४० लि.	६,८१,०२९/-
१२	एमएच-४३-ई-५७९४	१ नग	१८,००,०००/-
१३	उक्त टॅकरमधील जप्त डिझेलचा साठा	१२१४०.२२० लि.	६,७९,८५२/-
	एकूण		१,४९,१६,१०९/-

एकूण ६ टँकर व त्यामधील पेट्रोल ३०१२.६३० लिटर व डिझेल ६९४६७.२३० लि. इतका साठा जप्त करण्यात आला.

अशाप्रकारे आय.ओ.सी. कंपनीतील अधिकारी (१) विठ्ठल तुकाराम सावंत, ऑपरेशन ऑफीसर ग्रेड २, (२) प्रविण जनार्दन धनू, ऑपरेशन ऑफीसर ग्रेड ३, (३) कृष्णकुमार भिकाजी परब, ऑपरेटर फिड, (४) रामचंद्र गोविंद गवस, फोरमन, (५) के. बी. परब, ऑपरेटर फिड, (६) एकनाथ पांडूरंग परब, ऑपरेटर फिड, (७) एल. जे. निर्भवणे, ऑपरेटर फिड, (८) बाळासाहेब जनार्दन आवारे, सेक्युरिटी सुपरवायझर, (९) सुर्यलाल बिहारीलाल यादव, एमएच-०४-बीयू-९३६५ टँकर मालक व चालक, (१०) रामवृक्ष सोमई मौर्या, एमएच-४६-एफ-७७८६ चा चालक, (११) सुरेशकुमार रामशरण यादव, एमएच-०४-एएल-३२५४ चा चालक, (१२) भोला महंगू गुप्ता, एमएच-०४-सीए-५७०७ चा चालक व (१३) एमएच-४३-ई-५८२१ व एमएच-४३-ई-५७९४ चे चालक व या सहाही टँकरचे वाहतुकदार या सर्वांनी संगनमतानी आय.ओ.सी. तेल कंपनीतून डिझेल/पेट्रोलच्या चलनावर नमुद केल्यापेक्षा अतिरिक्त साठा भरुन घेऊन तो अनधिकृतरित्या विक्री करण्यासाठी घेऊन जात असल्याचे निष्पन्न होते. या सर्वांनी शासनाची व जनतेची फवणूक करुन पेट्रोल/डिझेल सारख्या अत्यावश्यक वस्तूचा काळाबाजार, गैरव्यवहार केल्याने, संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३, ७, ८, ९, १०, व दि मोटार स्पीरीट ॲण्ड हायस्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय, डिस्ट्रीब्युशन ॲण्ड प्रिव्हेंशन ऑफ माल प्रॅक्टीसेस) ऑर्डर २००५ चा भंग केल्यावरुन सर्व संबंधितांविरुध्द नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०४३/२०१२, दिनांक २५/११/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तपासी पोलिस अधिकारी यांचे वाचावे क्र. २ अन्वये प्राप्त अभिवेदनात नेरुळ पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करुन सहा टँकर व त्यामधील साठा जप्त करण्यात आला आहे. पोलिस ठाण्याचे आवारात अशा वाहनांना उभे करण्यास पुरेशी जागा नसल्याने सदर टँकर हे रोडचे कडेस असुरक्षित असे उभे करण्यात आले असुन नमूद टँकरमधुन काही प्रमाणात तेल पाझरताना दिसत आहे असे नमूद केले आहे.

तद्नंतर या कार्यालयाचे वाचावे क्र. ३ अन्वये वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना निर्गमित केलेल्या पत्रामध्ये सदर गुन्हा नोंद प्रकरणी जप्त टँकरमध्ये शासनाचा अनुदानीत डिझेलचा अतिरिक्त

साठा भरुन दिल्याचे आढळून आले आहे. सदरचे गैरकृत्य व होणाऱ्या गैरव्यवहारामुळे केंद्र अथवा राज्य शासनाचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान व फसवणूक होत असल्याचे दिसून येत आहे. इंडियन ऑईल कंपनी, वाशी टर्मिनस येथील कंपनीच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचाही सहभाग असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने या प्रकरणी सखोल तपास होणे गरजेचे असल्याची या कार्यालयाची धारणा आहे. सदर प्रकरणी आजमितीस तपासी पोलिस अधिकारी यांनी केलेल्या तपासाचा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा. जेणेकरुन शासनास अहवाल सादर करणे सुलभ होईल. तसेच नमूद गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या काही टँकरमधून तेल पाझरत असून अशा परिस्थितीत सदरचे टँकर त्याठिकाणी उभे करणे धोक्याचे असून सदरचा संभाव्य धोका टाळण्याच्या हेतूने सदर मालाची तात्काळ विल्हेवाट लावण्याचे आदेश होणेस विनंती केली आहे. सदर प्रकरणी सुनावणीची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच जप्त केलेल्या मुद्देमालाबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल. सबब, सदरचे टँकर हे सुरक्षित स्थळी ठेवण्यात यावे. अन्यथा टँकरमधून होणाऱ्या डिझेलच्या गळतीकरिता आपल्या स्तरावर आवश्यक उपाययोजना करण्यात यावी. जप्त मुद्देमालाचे राखण व जतन करण्याची आपली जबाबदारी असून टँकरमधील डिझेलच्या साठ्याची मोठ्या प्रमाणावर गळती झाल्यास शासनाचे आर्थिक नुकसान होईल, असे पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक १८/१२/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. अे. यु. पठाण यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ५ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस आय.ओ.सी. कंपनीचे सिनियर टर्मीनल मॅनेजर श्री. हर्षवर्धन गुप्ता व आय.ओ.सी. कंपनीचे डेप्युटी मॅनेजर श्री. आर. निलकंटन यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ६ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. ॲड. श्री. अनंत पत्की हे वकालतनाम्यासह टँकर क्र. एमएच-०४-बीयू-९३६५ चे मालक व चालक सुर्यलाल बिहारीलाल यादव, मे. राहत बल्क करिअर्स तथा टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ चे मालक राहत हुसेन खान व टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ चे मालक रामचंद्र रामसुमेर यादव यांचे वतीने उपस्थित राहून त्यांचे वाचावे क्र. ७ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले. रामचंद्र गोविंद गवस, विठ्ठल तुकाराम सावंत, कृष्णकुमार भिकाजी परब, प्रविण जनार्दन धनू,

एकनाथ पांडूरंग परब, लक्ष्मण जर्नादन निर्भवणे व बाळासाहेब जनार्दन आवारे या आय.ओ.सी. कंपनीचे कर्मचारी व त्यांच्या वतीने ॲड. श्री. बी.आर. रामचंदानी यांनी वकालतनाम्यासह उपस्थित राहून वाचावे क्र. ८ अन्वये संयुक्त लेखी निवेदन सादर केले.

सदर सुनावणीस उपस्थित आय.ओ.सी. वाशीचे टर्मिनल मॅनेजर हर्षवर्धन गुप्ता यांना जप्त सहा टँकर्समधील अतिरिक्त डिझेल साठा भरुन दिल्याची बाब निदर्शनास आणून दिली असता, त्यांनी उष्णतेमुळे वाढ झाल्याचे सांगितले. तथापी, सदर सहा टँकर्समध्ये प्रत्येक कप्प्यात साठ्याची वाढ झाली नसल्याची बाब निदर्शनास आणून वातावरणामुळे वाढ झाली असल्यास ती सर्व टँकरच्या प्रत्येक कप्प्यात झाली पाहिजे अशी विचारणा केली असता, याबाबत त्यांनी समाधानकारक उत्तर दिले नाही. तद्नंतर कंपनीत असलेल्या एकूण १५ फिलिंग पॉईंट पैकी ४ पॉईंट हे नादुरुस्त असल्याची बाब त्यांनी सांगितली, सदरचे नादुरुस्त पॉईंटचे कारणे स्पष्ट करणेबाबत सुचित केले असता सदर बाब मे. केंमट्रोलस् इंडस्ट्रिज लि. हे दुरुस्ती करीता करारबध्द असलेली कंपनी सांगू शकेल अशी मोघम स्वरुपाची उत्तरे दिली. मे. केंमट्रोलस् इंडस्ट्रिज लि. यांनी नादुरुस्त असलेल्या ४ पॉईंटबाबतचा अहवाल उपलब्ध नसल्याचे सांगितले. तद्नंतर सदर नादुरुस्त ४ पॉईंट पैकी २ पॉईंट हे चालू असल्याचे सांगून २ पॉईंट हे बंद असल्याचे सांगितले. म्हणजेच ४ पैकी २ नादुरुस्त पॉईंटमधून डिझेलचे वितरण सद्यस्थितीत होत असल्याची बाब निदर्शनास येते व सदर बाब सुनावणीस उपस्थित कंपनीचे कर्मचाऱ्यांनीही मान्य केली.

सदर प्रकरणी घटनास्थळी दोन टँकरचे चालक फरार झाल्याची बाब निदर्शनास आणून देऊन दोन्ही टँकरचे तसेच इतर ४ जप्त टँकरचे वाहतुकदार यांचे विरुध्द कारवाई करण्यात आली किंवा कसे, याबाबत विचारले असता, त्यांनी कारवाई केली नसल्याचे सांगितले. सबब, सदर बाबत अधिक खातरजमा करण्यासाठी तसेच तेल कंपनीचे धोरण जाणून घेण्यासाठी आय.ओ.सी. या तेल कंपनीचे वरिष्ठ अधिकाऱ्यांना सुनावणीस पाचारण करणे गरजेचे आहे.

सदर सुनावणीस अनुपस्थित आरोपी/अपचारी तसेच टर्मिनल मॅनेजर, आय.ओ.सी.चे वरिष्ठ अधिकारी, मे. केंमट्रोलस् इंडस्ट्रिज लि. चे व्यवस्थापक यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २६/१२/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २६/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सदर गुन्हा नोंद प्रकरणी जप्त मुद्देमाल हे ज्वलनशिल असून त्याची तात्काळ विल्हेवाट लावणे अगत्याचे आहे. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक १६/०१/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

0011 दिनांक १६/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. अे. यु. पठाण यांनी उपस्थित राहून लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस आय.ओ.सी. कंपनीचे डी.जी.एम. (ऑपरेशनस) श्री. एस.एस. बोस, आय.ओ.सी. कंपनीचे सिनियर टर्मीनल मॅनेजर श्री. हर्षवर्धन गुप्ता व आय.ओ.सी. कंपनीचे डेप्युटी मॅनेजर श्री. आर. निलकंटन, टँकर क्र. एमएच-०४-सीए-५७०७ चा मालक यांचे वतीने ईलियास नरोना, टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ चा मालक राहत हुसेन खान, टँकर क्र. एमएच ४३-ई-५८२१ व टँकर क्र. एमएच ४३-ई-५७९४ चे मालक म्हणुन शलीम चौधरी, टँकर क्र. एमएच-०४-बीयू-९३६५ चे मालक व चालक सुर्यलाल बिहारीलाल यादव, टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ चा मालक रामचंद्र रामसुमेर यादव, टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ चा चालक रामवृक्ष सोमई मौर्या, टँकर क्र. एमएच-०४-सीए-५७०७ चा चालक भोला महंगू गुप्ता व टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ चा चालक सुरेशकुमार रामशरण यादव हे उपस्थित राहिले. वरील पैकी टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ चे चालक व मालक यांनी वाचावे क्र. ११ अन्वये, टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ चे चालक व मालक यांनी वाचावे क्र. १२ अन्वये व टँकर क्र. एमएच-०४-सीए-५७०७ चे मालक व चालक यांनी वाचावे क्र. १३ अन्वये चालक व मालक यांचे संयुक्त लेखी निवेदने सादर केली. मे. आय.ओ.सी.चे टर्मिनल मॅनेजर यांनी मागील सुनावणीस सुचित केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे सादर केले नसून ते दोन दिवसात सादर करणार असल्याचे सांगितले. सदर प्रकरणी तपासी पोलिस अधिकारी यांचे मार्फत जप्त टँकरमधील साठ्याची पुर्नमोजदादची प्रक्रिया सुरु असून सदर मोजदाद आय.ओ.सी. चे अधिकारी, वैधमापन शास्त्र विभागाचे अधिकारी तसेच या विभागातील अधिकारी यांचे समक्ष व समवेत संयुक्त तपासणी करण्याची प्रक्रिया सुरु असुन दिनांक ०५/०१/२०१३ रोजी टँकर क्र. एमएच-०४-बीयू-९३६५ व दिनांक १५/०१/२०१३ रोजी टँकर क्र. एमएच-४३-ई-५७९४ व टँकर क्र. एमएच-०४-सीए-५७०७ असे मिळून एकूण ३ टँकरची पुर्नमोजदाद केली असता, तिन्ही टँकरमध्ये अतिरिक्त डिझेलचा साठा आढळून आला आहे. सदर प्रकरणी उर्वरीत तीन टँकरचे पुर्नमोजदाद करण्याचे पोलिसांकडून प्रस्तावीत आहे.

तद्नंतर सदरच्या एकुण सहा टँकरमधील साठ्याचे पुर्नमोजदादची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक (गुन्हे), यांचेकडुन अंतीम अहवाल वाचावे क्र. १५ अन्वये प्राप्त झाला आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. अे. यु. पठाण यांनी सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, प्रस्तूत गुन्ह्यात जप्त डिझेल व पेट्रोलने भरलेले टँकर हे नेरुळ पोलिस ठाण्याचे समोरील सार्वजनिक रोडचे कडेस उभे होते. त्या भागात आजुबाजुस नागरी लोकवस्ती आहे.

सदरचा रोड सतत वाहतुकीचा आहे. पोलिस ठाण्याचे आवारात अशा वाहनांना उभे करण्यास पुरेशी जागा नसल्याने सदर टँकरमधून काही प्रमाणात तेल पाझरतांना दिसत होते. अशा परिस्थितीत सदरचे टँकर त्या ठिकाणी उभे करणे धोक्याचे असल्याने सदरचा संभाव्य धोका टाळण्याचे हेतूने सदर टँकर हे आयओसी कंपनी समोर रोडवर पार्क करण्यात आले आहे. तेथे २४ तास पोलिस पहारा नेमण्यात आला आहे. सदर टँकरची शिधावाटप अधिकारी यांनी तपासणी केली असता त्यात प्रमाणपेक्षा जास्त माल आढळून आल्याने सदरचा गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचे तपासात पोलिसांनी आयओसी कंपनीचे कर्मचारी व अधिकारी यांचेकडे तपास केला असता त्यांचे म्हणणे आहे की, कंपनीत आलेले टँकरमध्ये माल भरण्याचे सर्व काम संगणकीकृत असल्याने टँकरमध्ये माल जास्त भरण्यात येत नाही. तसेच त्यांनी सदर मालाचे मोजमाप करण्यासाठी उपनियंत्रक, वैधमापण शास्त्र विभाग, सहावा माळा, कोकण भवन, नवी मुंबई यांना पत्र दिले असून त्यांनी सदर जप्त टँकरमधील डिझेल व टँकरचे मोजमाप करण्यासाठी दिनांक २०/१२/२०१२ रोजी तारीख दिली असून सदर वेळी सर्व संबंधितांना समक्ष हजर राहण्याबाबत कळविले आहे. सदर मोजणी एचपीसीएल नेरुळ येथे करण्यात येत आहे. तरी सदर टँकरची मोजणी वैधमापन शास्त्र विभाग, नवी मुंबई यांचे मार्फत होईपर्यंत त्याअनुषंगाने पुढील योग्य ते आदेश होण्यास विनंती आहे, असे नमूद आहे.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित आय.ओ.सी. कंपनीचे सिनियर टर्मीनल मॅनेजर श्री. हर्षवर्धन गुप्ता यांनी युक्तीवाद केला की, नेरुळ पोलिस ठाणे येथील गुन्हा नोंद प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमालाची रक्कम शासनजमा करावी. सदर प्रकरणी सहा टँकरमधील साठ्याचे कागदोपत्री पुर्तता झाली असुन त्यामुळे वाहतुकदारांच्या बाबत योग्य ते निर्णय घेण्यात यावेत. नियंत्रक यांनी सदर टँकर परत घेण्याबाबत निर्देशित केले आहे. त्यासाठी विशेष पद्धतचे अवलंब करावे लागेल ज्यामुळे त्यांचे कपंनीत टँकरचे लोडींगचे काम लांबणीवर पडेल असे सांगितले. तसेच त्यांच्या वाशी टर्मिनलमध्ये साठा अनलोडींग करण्याची तरतूद नसल्याचे सांगितले. त्यामुळे सदर सहा टँकरमधील जप्त डिझेलच्या साठ्याची विल्हेवाट राज्य समन्वय तेल उद्योग यांचेमार्फत करण्यात यावी असे सांगितले. जप्त टँकरमधील साठा हा आय.ओ.सी.चे रिटेल आऊटलेट अथवा उपभोक्तास विक्री करण्यात आला असुन त्याकरिता संगणकीय पद्धतीचे अवलंब करुन पुर्तता करण्यात आलेली आहे. जप्त टँकरचे टँक हे वैधमापनशास्त्र विभागाकडून वर्षातुन एकदा टँकर मालकांकडून प्रमाणित केले जात असुन सदरची प्रक्रिया वैधमापनशास्त्र विभागाचे निरिक्षक हे खाजगी आस्थापनांकडून करुन घेत असल्याचे सांगितले. टँकरमधील टाक्या हे कॅलिब्रेशन केले असल्याने सदरचे टँकर संगणकीय प्रणालीद्वारे मॅग्नेटीक कार्डमार्फत फिलिंग पॉईंटवर भरले जात आहे. टँकरचे फिलिंग पॉईंटवर फ्लो मीटर्सद्वारे भरणा करण्यात येत असुन सदरहू मीटरही वर्षातुन एकदा वैधमापनशास्त्र विभागाकडून प्रमाणित करुन घेण्यात येत आहे. त्यामुळे साठा भरण्याच्या प्रक्रियेमध्ये टँकर तसेच

संगणकीय फ्लो मीटर यांचे कॅलिब्रेशन झाले असल्याचे सांगितले. प्रत्येक दिवशीच्या सुरुवातीस पहिले टँकर भरल्यानंतर त्यामध्ये कॅलिब्रेशन केलेल्या डिप रॉडद्वारे पुर्नतपासणी करुन खातरजमा करण्यात आल्यानंतर त्यापुढे संगणकीय प्रणालीद्वारे दिवसभरात भरण्यात येणारे टँकर हे डिप रॉडद्वारे पुर्नतपासणी करण्यात येत नाही. कंपनीत कार्यान्वित असलेले संगणकीय प्रणालीमध्ये टँकर इनवर्ड व आऊटवर्डच्या अभिलेखाची नोंद करण्यात येत असुन याव्यतिरिक्त सुरक्षारक्षकही त्यांच्या नोंदवहीमध्ये नोंदी घेत असतात. एकुण १५ फिलिंग पॉईंटपैकी १३ फिलिंग पॉईंट कार्यरत असुन उर्वरित २ फिलिंग पॉईंटच्या फ्लो मीटरची दुरुस्तीकरीता परवानगी घेण्यात आली आहे. सेल इनव्हाईस वर तापमानाची नोंद करण्यात येत नसुन सदरची विक्री ही नैसर्गिक तापमानाच्या आधारे केली जात आहे. त्यामुळे सदर बाब लक्षात घेता रेशनिंग अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीमध्ये आढळुन आलेला अतिरिक्त साठा हा सद्यस्थितीत अचुक असल्याबाबत निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. टँकरचे कॅलिब्रेशन हे वाहतुकदारांमार्फत केले जात असुन त्याबाबतचे कॅलिब्रेशन प्रमाणपत्र त्यांचेकडून कंपनीत विहीत मुदतीमध्ये सादर करीत असल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित आय.ओ.सी. कंपनीचे डेप्युटी मॅनेजर श्री. आर. निलकंटन यांनी युक्तीवाद केला की, दिनांक २४/११/२०१२ रोजी रेशनिंग अधिकारी हे वाशी टर्मिनल येथे टँकरच्या तपासणीकरीता उपस्थित झाले. त्यावेळी सिनियर टर्मिनल मॅनेजर यांनी रेशनिंग अधिकारी यांना टँकरमधील साठ्याची डिप रॉडद्वारे मोजदाद करण्यासाठी त्यांची नेमणूक केल्याचे सांगितले. त्याअनुषंगाने त्यांनी प्राप्त आदेशानुसार रेशनिंग अधिकाऱ्यांना मोजदाद करणेकामी मदत केली. तपासणीचेवेळी रेशनिंग अधिकाऱ्यांनी संबंधित प्रत्येक टँकरच्या डिप रॉडद्वारे टँकरमधील साठ्याची त्यांचे समक्ष मोजदाद केली. तद्नंतर तपासणी पुर्ण केल्यानंतर आढळुन आलेल्या साठ्याबाबत अहवाल रेशनिंग अधिकाऱ्यांनी तयार केला व सदर अहवालावर त्यांनी सही करुन प्रमाणित केले असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस रामचंद्र गोविंद गवस, विठ्ठल तुकाराम सावंत, कृष्णकुमार भिकाजी परब, प्रविण जनार्दन धनू, एकनाथ पांडूरंग परब, लक्ष्मण जर्नादन निर्भवणे व बाळासाहेब जनार्दन आवारे या आय.ओ.सी. कंपनीचे कर्मचारी व त्यांच्या वतीने ॲड. श्री. बी.आर. रामचंदानी यांनी वकालतनाम्यासह उपस्थित राहून सादर केलेल्या संयुक्त लेखी निवेदनात, दिनांक २४/११/२०१२ रोजी आपल्या विभागात मिळालेल्या बातमीनुसार आय.ओ.सी., वाशी टर्मिनल येथे पेट्रोल आणि डिझेलचा साठा चलनापेक्षा अधिक टँकरमध्ये भरुन दिला जात असुन सदरचा अतिरिक्त साठा टँकरचे ड्राईव्हर अवैधरित्या बाहेरील व्यापाऱ्यांना विक्री करत असल्याची बाब त्यांना अवगत नाही. तसेच रेशनिंग विभागातील फिरते पथकातील अधिकारी नमूद टर्मिनल्समध्ये कधी उपस्थित झाले हे त्यांना माहित नाही. तसेच टँकर क्र. एमएच-०४-बीयु-९३६५, एमएच-४६-फ-७७८६, एमएच-

४३-ई-५८२१ व एमएच-४३-ई-५७९४ हे भरुन निघाल्यानंतर सदरचे चारही टँकर हे संशायास्पदरित्या गेटच्या बाहेर मिळुन आले हे त्यांना माहित नाही. तपासणीचेवेळी टँकर क्र. एमएच-०४-बीयु-९३६५ व एमएच-४६-फ-७७८६ च्या चालकांनी चलन दाखविले आहे. तसेच टँकर क्र. एमएच-४३-ई-५८२१ व एमएच-४३-ई-५७९४ चे चालक हे टँकरचे केबीन लॉक करुन पळुन गेल्याची बाब त्यांना माहित नाही. त्यामुळे तपासणी अधिकाऱ्यांनी टँकरच्या ड्रायव्हरांना काय सुचना दिल्या हे त्यांना माहित नाही. तपासणी अधिकाऱ्यांनी कोणत्या पद्धतीचा अवलंब करुन टर्मिनलच्या आवारात प्रवेश केला हे त्यांना माहित नाही. तसेच आय.ओ.सी. चे अधिकारी आणि रेशनिंगचे अधिकारी यांचेमध्ये काय बोलणे झाले हेही त्यांना माहित नाही. तसेच कंपनी गेटच्या बाहेर उभे असलेले टँकर हे कशासाठी पुन्हा कंपनीत आणले हे त्यांना माहित नाही. सदर चार टँकर हे कंपनीच्या बाहेर निघुन गेले ही वस्तुस्थिती असुन ते पुन्हा तासाभरानंतर कंपनीत आणले गेले असुन सदरचे टँकर हे चेकिंग पॉईंटवर का आणले गेले हेही त्यांना माहित नाही. टँकरमधील साठ्याची मोजदाद कशी केली हे त्यांना माहित नसुन कारण त्यावेळेस ते अनुपस्थितीत होते. त्यामुळे टँकरमधील मोजदाद केलेल्या साठ्याच्या आकडेवारीबाबत त्यांना माहित नाही. कंपनीकडे उपलब्ध असलेल्या मास्टर डिप रॉडद्वारे अधिकाऱ्यांनी मोजदाद केलेली नाही, त्यामुळे त्यांना माहित नाही तसेच कारणे दाखवा नोटीस मधील नमूद मोजदादची आकडेवारी त्यांना स्विकार्य नाही. कारण आय.ओ.सी. कडील उपलब्ध डिप रॉडद्वारे मोजदाद केलेली नाही. सदरची वस्तुस्थिती ही सर्व टँकरचे बाबतीत आहे. कंपनीमध्ये डिझेल व पेट्रोल या साठ्याची भरणा ऑटोमेटीक ऑपरेशनद्वारे केली जात असुन टँकरमधील कप्प्यामध्ये साठा पुर्ण भरल्यानंतर त्यामध्ये तात्काळ वितरण बंद होते याची खातरजमा आपण कोणत्याही तांत्रिक तज्ञांकडून अथवा आय.ओ.सी. च्या अधिकाऱ्यांकडून घेवु शकता. सदरहू टँकरमध्ये अतिरिक्त साठा भरुन मिळण्यासाठी आय.ओ.सी.च्या अधिकाऱ्यांना रक्कम दिल्याची बाब चुकीची असुन कारण ऑटोमेटीक सिस्टिममध्ये अतिरिक्त डिझेलचा साठा भरणे शक्य नाही. त्यामुळे टँकरचे ड्रायव्हर यांनी त्यांना शंभर रुपये दिल्याची बाब चुकीची आहे. टँकरचे ड्रायव्हर यांना त्यांचे नांव माहित नसल्याने सदर टँकरचे ड्रायव्हर यांनी जाणुनबुजून दिलेला जबाब चुकीचा असल्याचे सिद्ध होत आहे. तसेच टँकरचे ड्रायव्हर यांनी पंचासमक्ष काय कथन केले हे त्यांना माहित नाही. टर्मिनल मॅनेजर श्री. हर्षवर्धन गुप्ता व डेप्युटी मॅनेजर श्री. ए. निलकंटन यांच्यामध्ये काय संवाद झाला हे त्यांना माहिती नाही. सद्यस्थितीत ते त्यांच्या वरिष्ठांच्या कार्यपद्धतीबाबत काहीच भाष्य करु ईच्छित नाहीत. सदर साठ्याची मोजदाद कोणासमक्ष केली हे त्यांना माहित नाही. परंतु तद्नंतरच्या काळात चुकीच्या पद्धतीने मोजदाद केल्याचे त्यांना कळले. टँकरमधील डिझेलचा साठा अतिरिक्त आढळुन आला हे त्यांना माहित नाही. कारण सदरची प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर त्यांना पाचारण करण्यात आले होते. सदर प्रकरणी कारणे दाखवा नोटीसमध्ये नमूद केल्यानुसार त्यांनी कोणताही गुन्हा केलेला नाही. याबाबत नेरुळ पोलिस ठाणे येथे तक्रार दिल्यानंतर त्यांना अवगत झाले. सदर

बाबत त्यांना जिल्हा सत्र न्यायालय, ठाणे या न्यायालयाकडुन अटकपुर्व जामीन मंजूर झाले आहे. ते सर्वजण आय.ओ.सी.चे कर्मचारी असुन त्यांचा नमूद गुन्ह्यात कोणत्याही प्रकारचा सहभाग असल्याचा पुरावा सिद्ध झालेला नाही. जप्त मुद्देमालापैकी टँकरचा त्यांच्यांशी कोणताही संबंध नाही. त्यामुळे न्यायिक दृष्टिकोनातुन कारणे दाखवा नोटीसमध्ये नमूद केलेले आरोप परत घेण्यात यावेत अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस ॲड. श्री. अनंत पत्की हे वकालतनाम्यासह टँकर क्र. एमएच-०४-बीयू-९३६५ चे मालक व चालक सुर्यलाल बिहारीलाल यादव यांच्या वतीने उपस्थित राहून सादर केलेल्या लेखी निवेदनात, नेरुळ पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंद प्रकरणी त्यांचे अशिलास अटक केल्याचे नमूद केले आहे. जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब अन्वये नोटीस प्राप्त झाली असुन त्यांचे अशिलाने टँकर क्र. एमएच-०४-बीयू-९३६५ हे टँकर श्रीराम फायनान्स कंपनीकडून कर्जावर घेतले असुन त्याचा मासिक हफ्ता रु. १७,१९६/- आहे. टँकर मालकाचा उदरनिर्वाह हा पुर्णपणे टँकरवर अवलंबुन आहे. सदर टँकर मालकाचा आय.ओ.सी. या कंपनीसोबत करारनामा असुन तो प्रामाणिकपणे काम करीत आहे. आय.ओ.सी. कंपनी वाशी टर्मिनल येथील चलनानुसार साठा भरुन मिळाल्यानंतर चलनावरील नमूद ठिकाणी वितरण केले जाते. प्रचलित पद्धतीनुसार आय.ओ.सी. कंपनी टँकर भरल्यानंतर ते कुलूपबंद करुन त्याची चावी कंपनीच्या ताब्यात असते. कंपनीच्या पद्धतीनुसार तापमानात वाढ झाल्यानंतर साठ्यात वाढ होते आणि तापमान घसरल्यानंतर साठा कमी होतो. तपासणीचे दिवशी टँकर भरल्यानंतर त्यांचे टँकर ताब्यात घेण्यात आले आणि दुपारी ३.०० वाजणेच्या सुमारास डिप रॉडद्वारे त्यामधील साठ्याची मोजदाद करण्यात आली. त्यामुळे नैसर्गिकरित्या तापमानात वाढ झाल्यामुळे साठ्यामध्ये ४० ते ५० लिटर अधिकचा फरक दिसुन आला. टँकरमधील अतिरिक्त साठा हा काळ्याबाजाराने विक्री करीत असल्याची बाब पुराव्यांनिशी सिद्ध होत नाही. त्यांचा टँकर कंपनीच्या आवारात अथवा पोलिस ठाणे येथे पडून राहिल्यास टँकरच्या इंजिन, टायर्स व इतर उपकरणांमध्ये बिघाड होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर टँकरचा तो अधिकृत मालक असल्याने त्यांना क्षतीपुर्ती बंधपत्राद्वारे अथवा हमीपत्रावर परत करण्याची विनंती केली. टँकरमधील साठा हा आय.ओ.सी. कंपनीचा असल्याने तो योग्य त्या अटी व शर्तीवर कंपनीत परत करण्यात यावा तसेच त्यांचा जप्त करण्यात आलेला टँकर हा योग्य अटी व शर्तीवर त्यांना परत करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस ॲड. श्री. अनंत पत्की हे वकालतनाम्यासह मे. राहत बल्क करिअर्स तथा टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ चे मालक राहत हुसेन खान यांच्या वतीने उपस्थित राहून सादर केलेल्या लेखी निवेदनात, त्यांचे अशिल हे राहत बल्क करिअर्स या नावाने वाहतुकदाराचा व्यवसाय करीत असुन त्याकरीता ते आय.ओ.सी. कंपनीशी करारबद्ध आहेत. दिनांक २४/११/२०१३ रोजी ११.०० वाजणेचे सुमारास

जगन्नाथ काशिनाथ पवार आणि इतर अधिकारी यांना आय.ओ.सी. वाशी टर्मिनल येथील कर्मचारी हे टँकरमध्ये चलनापेक्षा अतिरिक्त डिझेल व पेट्रोल भरुन दिले जात असल्याची बातमी मिळाल्यानंतर त्यांनी पंचांसह धाड टाकली. धाडीचेवेळी एकुण सहा टँकरमध्ये चलनापेक्षा अतिरिक्त साठा भरुन दिल्याचे आढळुन आले. त्यामुळे सहा टँकर हे त्यामधील साठ्यासह नेरुळ पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंद करुन जप्त करण्यात आले आहे. सदर प्रकरणी पुढील तपास सुरु असुन त्यांचा टँकर हा अनावश्यकरित्या नेरुळ पोलिस ठाणे येथे जप्त ठेवला आहे. सहा टँकरपैकी एमएच-४६-एफ-७७८६ हा टँकर त्यांचे अशिलाचे मालकीचा असुन त्यामध्ये चलनामधील नमूद १२००० लिटर साठ्यापेक्षा अतिरिक्त ३०.१७० लिटर साठा भरुन दिल्याची नोंद आहे. परंतू, सदरचा अतिरिक्त साठा हा गुन्हा नोंद करण्या इतपत गंभीर नाही. कारण टँकरमधील साठ्याचे वध/घट हे तापमानावर अवलंबून आहे. जप्त करण्यात आलेला त्यांचा टँकर हा गरज पडेल त्यावेळेस संबंधित प्राधिकरणाचे समक्ष हजर करण्यात येईल. त्यांचा व्यवसाय हा अंतिमरित्या टँकरवर अवलंबून असल्याने गरज नसताना त्यांचा टँकर जप्त केला नसल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे नेरुळ पोलिस ठाणे यांना सूचित करण्यात यावे की, जप्त करण्यात आलेला टँकर हा योग्यत्या अटीं व शर्तीवर त्यांचे अशिल नामे राहत हुसेन खान यांना परत करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस ॲड. श्री. अनंत पत्की हे वकालतनाम्यासह टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ चे मालक रामचंद्र रामसुमेर यादव यांच्या वतीने उपस्थित राहून सादर केलेल्या लेखी निवेदनात, नेरुळ पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंद प्रकरणी त्यांचे अशिलास अटक केल्याचे नमूद केले आहे. जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब अन्वये नोटीस प्राप्त झाली असुन त्यांचे अशिलाचा उदरनिर्वाह हा टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ या टँकरवर पुर्णपणे अवलंबुन आहे. सदर टँकर मालकाचा आय.ओ.सी. या कंपनीसोबत मागिल १० वर्षापासून करार असुन तो प्रामाणिकपणे काम करीत आहे. आय.ओ.सी. कंपनी वाशी टर्मिनल येथील चलनानुसार साठा भरुन मिळाल्यानंतर चलनावरील नमूद ठिकाणी वितरण केले जाते. प्रचलित पद्धतीनुसार आय.ओ.सी. कंपनी टँकर भरल्यानंतर ते कुलूपबंद करुन त्याची चावी कंपनीच्या ताब्यात असते. कंपनीच्या पद्धतीनुसार तापमानात वाढ झाल्यानंतर साठ्यात वाढ होते आणि तापमान घसरल्यानंतर साठा कमी होतो. तपासणीचे दिवशी टँकर भरल्यानंतर त्यांचे टँकर ताब्यात घेण्यात आले आणि दुपारी ३.०० वाजणेच्या सुमारास डिप रॉडद्वारे त्यामधील साठ्याची मोजदाद करण्यात आली. त्यामुळे नैसर्गिकरित्या तापमानात वाढ झाल्यामुळे साठ्यामध्ये ४० ते ५० लिटर अधिकचा फरक दिसुन आला. टँकरमधील अतिरिक्त साठा हा काळ्याबाजाराने विक्री करीत असल्याची बाब पुराव्यानिशी सिद्ध होत नाही. त्यांचा टँकर कंपनीच्या आवारात अथवा पोलिस ठाणे येथे पडून राहिल्यास टँकरच्या इंजिन, टायर्स व इतर उपकरणांमध्ये बिघाड होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर टँकरचा

तो अधिकृत मालक असल्याने त्यांना क्षतीपुर्ती बंधपत्राद्वारे अथवा हमीपत्रावर परत करण्याची विनंती केली. टँकरमधील साठा हा आय.ओ.सी. कंपनीचा असल्याने तो योग्यत्या अटी व शर्तीवर कंपनीत परत करण्यात यावा तसेच त्यांचा जप्त करण्यात आलेला टँकर हा योग्य अटी व शर्तीवर त्यांना परत करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १६/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ चा चालक रामवृक्ष सोमई मौर्या, टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ चा वाहतुकदार तथा राहत बल्क कॅरीअर्सचे मालक राहत हुसेन खान यांनी युक्तीवाद केला की, एमएच-४६-एफ-७७८६ या टँकरचे मे. राहत बल्क कॅरीअर्सचे अधिकृत मालक असुन त्यासंबंधीचे पुरावेदर्शक कागदपत्रे त्यांचे नावे आहेत. सदर कंपनी ही वाहुतकीचा व्यवसाय करीत असुन ते आय.ओ.सी. या कंपनीचे अधिकृत वाहतुकदार आहेत. सदर कंपनीने रामवृक्ष सोमई मौर्या यास नमूद टँकरवर चालक म्हणुन नेमले आहे. प्रचलित पद्धतीनुसार टँकर हा आय.ओ.सी. कंपनीच्या बाहेर उभा केला जात असुन कंपनीतुन हाक दिल्यानंतर टँकर भरण्यासाठी कंपनीत प्रवेश करीत असतो. प्रवेश केल्यानंतर टँकर हा फिलिंग पॉईंट येथे जात असुन त्याठिकाणी संपूर्णरित्या स्वयंचलित यंत्रणा असुन त्याद्वारे पेट्रोलियम पदार्थाची चलानानुसार भरणा केली जात आहे. सदर फिलिंग पॉईंटवर कोणत्याही माणसाचा साठा भरण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभाग नसुन टँकरमध्ये साठा भरल्यानंतर ते तात्काळ लॉक होत असुन तद्नंतर कंपनीचे प्रतिनिधी त्यास सिलबंद करुन टँकर चालकाच्या हाती चलन देवुन तो उपभोक्त्यास वितरणासाठी पाठविला जातो. दिनांक २४/११/२०१२ रोजी टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ हा टँकर त्यांचा नंबर आल्यानंतर भरण्यासाठी आतमध्ये घेण्यात आला. तद्नंतर प्रचलित पद्धतीनुसार टँकरमध्ये स्वयंचलित फिलिंग मशिनद्वारे १२००० लिटर्सचा साठा भरुन तो कुलूपबंद व सिलबंद करण्यात आला. तद्नंतर सदरचा टँकर कल्याण रेल्वे येथे पाठविण्याकरीता टँकरचालकाच्या ताब्यात चलन देण्यात आले. कंपनीमधुन टँकर बाहेर निघाल्यानंतर तो रेशनिंग अधिकाऱ्यांनी तात्काळ ताब्यात घेतला व सदर टँकर पुन्हा कंपनीत आणून आय.ओ.सी.चे डी.जी.एम. श्री. आर. निलकंटन यांना तपासणीकरीता विनंती केली. तपासणीचे वेळी टँकर हे सिलबंद होते. तपासणीनंतर सदर टँकरमध्ये ३०.१७० लिटर डिझेलचा साठा अतिरिक्त आढळुन आला त्याआधारे त्यांचा टँकर नेरुळ पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंद करुन जप्त करण्यात आला आहे. टँकरमधील अतिरिक्त आढळुन आलेला साठा हा नादुरुस्त मॅकेनिजम अथवा चुकीची मोजदाद करण्यात आल्यामुळे असुन त्यासाठी टँकरच्या चालकास जबाबदार धरता येणार नाही. क्रिमीनल लॉ नुसार टँकरचालकाने केलेल्या गुन्ह्यात टँकर मालकास जबाबदार धरता येणार नाही ही मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सीआरएलजे/१३४१ या प्रकरणी सन १९७९ साली पारित केलेल्या आदेशात नमूद केले आहे. सदर प्रकरणी टँकर चालक अथवा मालकास तेल कंपनीने बेजबाबदारीमुळे अथवा नादुरुस्त मॅकेनिजममुळे जबाबदार धरता येणार नाही. टँकरमधील साठा हा आय.ओ.सी.

कंपनीचा असल्यामुळे तो त्यांना योग्यत्या अटी व शर्तीवर तसेच टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ हा टँकर त्यांना वाजवी अटी व शर्तीवर परत करण्यात यावा, असे सांगून तसे एकत्रित लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १६/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ चा चालक सुरेशकुमार रामशरण यादव, टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ चा मालक रामसुमेर यादव व टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ चा वाहतुकदार तथा मे. साई रोडवेसचे मालक रासुमेर यादव यांनी युक्तीवाद केला की, एमएच-०४-एएल-३२५४ या टँकरचे मे. साई रोडवेस हे अधिकृत मालक असुन त्यासंबंधीचे पुरावेदर्शक कागदपत्रे त्यांचे नावे आहेत. सदर कंपनी ही वाहुतकीचा व्यवसाय करीत असुन ते आय.ओ.सी. या कंपनीचे अधिकृत वाहतुकदार आहेत. सदर कंपनीने सुरेशकुमार रामशरण यादव यास नमूद टँकरवर चालक म्हणुन नेमले आहे. प्रचलित पद्धतीनुसार टँकर हा आय.ओ.सी. कंपनीच्या बाहेर उभा केला जात असुन कंपनीतुन हाक दिल्यानंतर टँकर भरण्यासाठी कंपनीत प्रवेश करीत असतो. प्रवेश केल्यानंतर टँकर हा फिलिंग पॉईंट येथे जात असुन त्याठिकाणी संपूर्णरित्या स्वयंचलित यंत्रणा असुन त्याद्वारे पेट्रोलियम पदार्थाची चलानानुसार भरणा केली जात आहे. सदर फिलिंग पॉईंटवर कोणत्याही माणसाचा साठा भरण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभाग नंसुन टँकरमध्ये साठा भरल्यानंतर ते तात्काळ लॉक होत असुन तद्नंतर कंपनीचे प्रतिनिधी त्यास सिलबंद करुन टँकर चालकाच्या हाती चलन देवुन तो उपभोक्त्यास वितरणासाठी पाठविला जातो. दिनांक २४/११/२०१२ रोजी टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ हा टँकर त्यांचा नंबर आल्यानंतर भरण्यासाठी आतमध्ये घेण्यात आला. तद्नंतर प्रचलित पद्धतीनुसार टँकरमध्ये स्वयंचलित फिलिंग मशिन्सद्वारे १२००० लिटर्सचा साठा भरुन तो कुलूपबंद व सिलबंद करण्यात आला. तद्नंतर सदरचा टँकर टँकरचालकाच्या ताब्यात देवुन त्यास चलन देण्यात आले. तद्नंतर आय.ओ.सी.चे डी.जी.एम. श्री. आर. निलकंटन यांनी सदर टँकरची आकस्मिक तपासणी केली. तपासणीचे वेळी टँकर हे सिलबंद होते. तपासणीनंतर सदर टँकरमध्ये २८.०५० लिटर डिझेल व पेट्रोलचा साठा अतिरिक्त आढळुन आला. त्याआधारे त्यांचा टँकर नेरुळ पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंद करुन जप्त करण्यात आला आहे. टँकरमधील अतिरिक्त आढळुन आलेला साठा हा नादुरुस्त मॅकेनिजम अथवा चुकीची मोजदाद करण्यात आल्यामुळे असुन त्यासाठी टँकरच्या चालकास जबाबदार धरता येणार नाही. क्रिमीनल लॉ नुसार टँकरचालकाने केलेल्या गुन्ह्यात टँकर मालकास जबाबदार धरता येणार नाही ही मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सीआरएलजे/१३४१ या प्रकरणी सन १९७९ साली पारित केलेल्या आदेशात नमूद केले आहे. सदर प्रकरणी टँकर चालक अथवा मालकास तेल कंपनीच्या बेजबाबदारीमुळे अथवा नादुरुस्त मॅकेनिजममुळे जबाबदार धरता येणार नाही. टँकरमधील साठा हा आय.ओ.सी. कंपनीचा असल्यामुळे तो त्यांना योग्यत्या अटी व शर्तीवर तसेच टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ हा टँकर त्यांना वाजवी अटी व शर्तीवर परत करण्यात यावा, असे सांगून तसे संयुक्त लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १६/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टँकर क्र. एमएच-०४-सीए-५७०७ चा चालक भोला महंगू गुप्ता, टँकर क्र. एमएच-०४-सीए-५७०७ चा मालक शायनी शिपींग ॲन्ड लॉजिस्टिक प्रा.लि. व टँकर क्र. एमएच-०४-सीए-५७०७ चा वाहतुकदार शायनी शिपींग ॲन्ड लॉजिस्टिक प्रा.लि. यांनी युक्तीवाद केला की, एमएच-०४-सीए-५७०७ या टँकरचे मे. शायनी शिपींग ॲन्ड लॉजिस्टिक प्रा.लि. हे अधिकृत मालक असुन त्यासंबंधीचे पुरावेदर्शक कागदपत्रे त्यांचे नावे आहेत. सदर कंपनी ही वाहुतकीचा व्यवसाय करीत असुन ते आय.ओ.सी. या कंपनीचे अधिकृत वाहतुकदार आहेत. सदर कंपनीने भोला महंगू गुप्ता यास नमूद टँकरवर चालक म्हणुन नेमले आहे. प्रचलित पद्धतीनुसार टँकर हा आय.ओ.सी. कंपनीच्या बाहेर उभा केला जात असुन कंपनीतुन हाक दिल्यानंतर टँकर भरण्यासाठी कंपनीत प्रवेश करीत असतो. प्रवेश केल्यानंतर टँकर हा फिलिंग पॉईंट येथे जात असुन त्याठिकाणी संपूर्णरित्या स्वयंचलित यंत्रणा असुन त्याद्वारे पेट्रोलियम पदार्थाची चलानानुसार भरणा केली जात आहे. सदर फिलिंग पॉईंटवर कोणत्याही माणसाचा साठा भरण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभाग नसुन टँकरमध्ये साठा भरल्यानंतर ते तात्काळ लॉक होत असुन तद्नंतर कंपनीचे प्रतिनिधी त्यास सिलबंद करुन टँकर चालकाच्या हाती चलन देवुन तो उपभोक्त्यास वितरणासाठी पाठविला जातो. दिनांक २४/११/२०१२ रोजी टँकर क्र. एमएच-०४-सीए-५७०७ हा टँकर त्यांचा नंबर आल्यानंतर भरण्यासाठी आतमध्ये घेण्यात आला. तद्नंतर प्रचलित पद्धतीनुसार टँकरमध्ये स्वयंचलित फिलिंग मशिन्सद्वारे १२००० लिटर्सचा साठा भरुन तो कुलूपबंद व सिलबंद करण्यात आला. तद्नंतर सदरचा टँकर टँकरचालकाच्या ताब्यात देवुन त्यास चलन देण्यात आले. तद्नंतर आय.ओ.सी.चे डी.जी.एम. श्री. आर. निलकंटन यांनी सदर टँकरची आकस्मिक तपासणी केली. तपासणीचे वेळी टँकर हे सिलबंद होते. तपासणीनंतर सदर टँकरमध्ये ६९.७३० लिटर डिझेलचा साठा अतिरिक्त आढळुन आला. त्याआधारे त्यांचा टँकर नेरुळ पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंद करुन जप्त करण्यात आला आहे. टँकरमधील अतिरिक्त आढळुन आलेला साठा हा नादुरुस्त मॅकेनिजम अथवा चुकीची मोजदाद करण्यात आल्यामुळे असुन त्यासाठी टँकरच्या चालकास जबाबदार धरता येणार नाही. क्रिमीनल लॉ नुसार टँकरचालकाने केलेल्या गुन्ह्यात टँकर मालकास जबाबदार धरता येणार नाही ही मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सीआरएलजे/१३४१ या प्रकरणी सन १९७९ साली पारित केलेल्या आदेशात नमूद केले आहे. सदर प्रकरणी टँकर चालक अथवा मालकास तेल कंपनीच्या बेजबाबदारीमुळे अथवा नादुरुस्त मॅकेनिजममुळे जबाबदार धरता येणार नाही. टँकरमधील साठा हा आय.ओ.सी. कंपनीचा असल्यामुळे तो त्यांना योग्यत्या अटी व शर्तीवर तसेच टँकर क्र. एमएच-०४-सीए-५७०७ हा टँकर त्यांना वाजवी अटी व शर्तीवर परत करण्यात यावा, असे सांगून तसे संयुक्त लेखी निवेदन सादर केले.

पोलिस निरिक्षक (गुन्हे), नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २६/०२/२०१३ रोजी या कार्यालयास प्राप्त अभिवेदनात नेरुळ पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंद प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या सहा टँकरमधील डिझेल व

पेट्रोलचा साठा मा. उपनियंत्रक वैधमापनशास्त्र विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचे मार्फत मोजदाद करण्यात आला. त्यानुसार टँकर क्र. एमएच-०४-बीयु-९३६५ या टँकरमधील साठ्याचे दिनांक ०५/०१/२०१३ रोजी मोजदाद घेण्यात आले असता कप्पा क्रमांक १, २ व ३ मध्ये कमी व कप्पा क्रमांक ४ मध्ये २१ लिटर डिझेलचा जादा साठा मिळुन आला आहे. टँकर क्र. एमएच-४३-ई-५७९४ या टँकरमधील साठ्याचे दिनांक १५/०१/२०१३ रोजी मोजदाद घेण्यात आले असता कप्पा क्रमांक १, २ व ४ मध्ये कमी व कप्पा क्रमांक ३ मध्ये ५६.५ लिटर डिझेलचा जादा साठा मिळुन आला आहे. टँकर क्र. एमएच-०४-सीए-५७०७ या टँकरमधील साठ्याचे दिनांक १५/०१/२०१२ रोजी मोजदाद घेण्यात आले असता कप्पा क्रमांक १ व २ मध्ये कमी व कप्पा क्रमांक ३ मध्ये ३४ लिटर डिझेलचा जादा साठा मिळुन आला आहे. टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ या टँकरमधील साठ्याचे दिनांक ३१/०१/२०१३ रोजी मोजदाद घेण्यात आले असता कप्पा क्रमांक १, २, ३ व ४ या चारही कप्प्यात कमी साठा मिळुन आला आहे. टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ या टँकरमधील साठ्याचे दिनांक ३१/०१/२०१३ रोजी मोजदाद घेण्यात आले असता कप्पा क्रमांक १, ३ व ४ मध्ये कमी व कप्पा क्रमांक २ मध्ये ५.५०० लिटर डिझेलचा जादा साठा मिळुन आला आहे. टँकर क्र. एमएच-४३-ई-५८२१ या टँकरमधील साठ्याचे दिनांक ३१/०१/२०१३ रोजी मोजदाद घेण्यात आले असता कप्पा क्रमांक १, २ व ३ मध्ये कमी व कप्पा क्रमांक ४ मध्ये ४२ लिटर डिझेलचा जादा साठा मिळुन आला आहे. वरील टँकर मधील डिझेल व पेट्रोल टँकरचे मोजदाद करण्यात आले आहे. सदर टँकरमधील डिझेल व पेट्रोल हे दिनांक २४/११/२०१२ ते नमूद केलेले तपासणीचे तारखेच्या कालावधीपर्यंत टँकरमधील मालाची गळती झाल्यानंतर मिळुन आले आहे. सदर गुन्ह्यातील कंपनीचे कर्मचारी यांनी मा. न्यायालयातुन अटकपुर्व जामिन मंजूर केला आहे. तरी सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमालाचे विल्हेवाटीचे पुढील आदेश निर्गमित होण्याची विनंती आहे, असे नमुद केले आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २४/११/२०१२ रोजी या कार्यालयाच्या अधिपत्याखालील फिरत्या पथकाने इंडियन ऑईल कंपनी, वाशी टर्मिनस या कंपनीमध्ये पेट्रोल/डिझेलच्या टँकरमध्ये चलनावरील नमूद साठ्यापेक्षा अधिक प्रमाणात पेट्रोल/डिझेलचा साठा मिळून आल्याने टँकर क्र. एमएच-०४-बीयु-९३६५, एमएच-४३-ई-५७९४, एमएच-०४-सीए-५७०७, एमएच-४६-एफ-७७८६, एमएच-०४-एएल-३२५४ व एमएच-४३-ई-५८२१ हे सहा टँकर्स त्यामधील अतिरिक्त डिझेल साठ्यासहीत जप्त करुन संबंधितांविरुध्द नेरुळ पोलिस

ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०४३/२०१२, दिनांक २५/११/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन एकूण १,४९,१६,१०९/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

उपरोक्त गुन्हा नोंद प्रकरणी या कार्यालयाच्या फिरते पथकामार्फत मे. आय.ओ.सी. या तेल कंपनीच्या वाशी येथील टर्मिनसमध्ये धाड टाकुन मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार एकुण ६ टँकर्समधील कंपनीने भरणा केलेल्या साठ्याची नमूद कंपनीचे उपव्यवस्थापक श्री. आर. निलकंटन यांच्या समवेत व समक्ष पुन्हा मोजदाद केली असता सदरचे सहाही टँकरमधील प्रत्येकी एक कण्यात डिझेलचा अतिरिक्त साठा मिळुन आला आहे. सदर संयुक्त तपासणीचेवेळी प्रचलित पद्धतीचा अवलंब करुन प्रत्येक टँकरमधील वैधमापनशास्त्र विभागाने प्रमाणित केलेल्या डिप रॉडद्वारे मोजदाद करण्यात आली असुन तपासणी अखेर फिरते पथक तसेच उपस्थित कंपनीचे उपव्यवस्थापक यांनी डिझेलचा साठा सहाही टँकर्समध्ये अतिरिक्त असल्याचे निष्कर्षाप्रत येवुन त्याअनुषंगाने तयार करण्यात आलेल्या अंतिम मोजदाद अहवालावर संयुक्तरित्या स्वाक्षरीसह प्रमाणित केले आहे. सदर मोजदादच्या प्रक्रियेमध्ये समाविष्ठ असलेले उपव्यवस्थापक यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात तसेच सुनावणीचेवेळी केलेल्या खुलाश्यात याबाबत दुजोरा दिलेला आहे ही बाब नमूद करावीशी वाटते. मे. आय.ओ.सी. ही तेल कंपनी केंद्र शासनाची अंगिकृत असलेली उपक्रम कंपनी असुन त्याअनुषंगाने मे. आय.ओ.सी. तसेच याव्यतिरिक्त इतर तेल कंपन्यांमार्फत डिझेल व पेट्रोलचे वैध परवानाधारक असलेल्या उपभोक्त्यास मागणीनुसार विक्री केले जाते. त्यापैकी डिझेल या पेट्रोलियम पदार्थावर केंद्र शासनाकडुन अनुदानापोटी भरीव रक्कम खर्च केली जात आहे. सदर पेट्रोलियम पदार्थाच्या वितरणावर देखरेख करण्याची प्रत्येक टर्मिनसच्या सिनियर टर्मिनल मॅनेजर यांची संपूर्ण जबाबदारी आहे. सदर प्रकरणी तपासणीचे वेळी मे. आय.ओ.सी. या कंपनीच्या वाशी टर्मिनसचे सिनियर टर्मिनल मॅनेजर श्री. हर्षवर्धन गुप्ता यांनी तपासणी पथकास आवश्यकते सहकार्य करणे अपेक्षित होते. तथापी, तपासणी पथकास असे निदर्शनास आले की, श्री. हर्षवर्धन गुप्ता यांनी तपासणीमध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती न स्विकारता अत्यंत बेजबाबदारपणे तपासणी पथकास असहकार्य करुन शासनाचे वतीने होत असलेल्या कारवाईमध्ये विविध सबबी सांगुन शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. श्री. हर्षवर्धन गुप्ता यांनी सुनावणीचेवेळी केलेल्या खुलाश्यात सहा टँकर्समधील जप्त साठ्याची मागणी न करता सदरचा जप्त केलेल्या डिझेल व पेट्रोलच्या साठ्याची विल्हेवाट लावताना सदरचा साठा हा राज्य समन्वय तेल उद्योग यांचेमार्फत विल्हेवाट करुन येणारी रक्कम शासनजमा करावी अशी विनंती केली आहे. वास्तविक पाहता नमूद सहा टँकर्समधील जप्त करण्यात आलेला साठा हा वाहतुकदारामार्फत त्यांच्या टँकरद्वारे प्रत्यक्ष उपभोक्त्यास वितरण केले जाते. अशावेळी उपभोक्त्याने केलेल्या मागणीनुसार व मागणी केलेल्या साठ्याची रक्कम अदा केल्यानंतर संबंधित तेल कंपनीकडून त्यांनी नेमणूक केलेल्या वाहतुकदारामार्फत उपभोक्त्यास साठ्याचे वितरण केले जाते. सदर प्रकरणी जप्त केलेल्या

सहा टॅकर्समधील साठा हा बहुतांशी शासकीय आस्थापनेशी संबंधित असलेल्या उपभोक्त्यांचा असून सदर शासकीय आस्थापनांच्या वितरणाकरीता भरणा केलेला साठा हा जप्त असल्याने मे. आय.ओ.सी. या तेल कंपनीने पर्यायी व्यवस्था म्हणुन त्यांना इतर टॅकरमार्फत त्यांनी मागणी केलेल्या डिझेल साठ्याचे वितरण केल्याचे दिसून येते. ज्याअर्थी, शासकीय आस्थापनांना त्यांनी मागणी केलेल्या साठ्याची आवक झाली आहे. त्याअर्थी नमूद गुन्ह्यातील जप्त सहा टॅकर्समधील साठा हा मे. आय.ओ.सी. या तेल कंपनीचा असल्याचे दिसून येते. तथापी, सिनियर टर्मिनल मॅनेजर श्री. हर्षवर्धन गुप्ता यांनी सदर जप्त साठ्याची मागणी न करता तो साठा राज्य समन्वय तेल उद्योग यांना देण्यात यावा अशी विनंती केली, ही आश्चर्यजनक बाब आहे. यावरुन श्री. हर्षवर्धन गुप्ता हे सदर कारवाईमध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती स्विकारुन त्याअनुषंगाने भविष्यामध्ये वाशी टर्मिनस येथे असे गैरप्रकार घडू नये त्याकरीता आवश्यकत्या उपाययोजना करण्याच्या मनस्थितीमध्ये नसल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सदर कृत्यामुळे ते केंद्र शासनाचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान करीत असल्याचे दिसुन येते.

तपासणी पथकास घटनास्थळी सहा टॅकर्समधील मिळुन आलेल्या अतिरिक्त साठ्यासाठी संबंधित तेल कंपनीचे फिलिंग पॉईंटवरील कर्मचारी हे प्रत्यक्षात अतिरिक्त साठ्याच्या वितरणासाठी जबाबदार असल्याचे सिद्ध झाल्याने संबंधित कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर फिलिंग पॉईंटवरील कर्मचाऱ्यांनी सुनावणीचे वेळी केलेल्या खुलाश्यात फिलिंग पॉईंटवरील वितरणाची पद्धत ही स्वयंचलित असल्याने त्यांचा वितरणाशी थेट संबंध नसल्याचे सांगितले आहे. तथापी, घटनास्थळी पंचांसमक्ष तसेच उपस्थित कंपनीच्या अधिकाऱ्यांसमक्ष मिळुन आलेला अतिरिक्त साठा हा फिलिंग पॉईंटवरील स्वयंचलित यंत्रामध्ये तांत्रिक दृष्टिकोनातुन केलेल्या फेरफारमुंळे झाल्याचे सिद्ध होत आहे. सदर स्वयंचलित यत्रांच्या देखभालाकरीता मे. आय.ओ.सी., वाशी टर्मिनस यांनी मे. केंमट्रोलस् इंडस्ट्रिज लि. या कंपनीस करारबद्ध केल्याचे सिनियर टर्मिनल मॅनेजर यांनी सुनावणीचे वेळी स्पष्ट केले आहे. सदर बाबत, अधिक खातरजमा करण्याकरीता या कार्यालयाने मे. केंमट्रोलस् इंडस्ट्रिज लि. या कंपनीचे व्यवस्थापक यांना सुनावणीस पाचारण करुनही ते उपस्थित राहिले नाहीत, ही बाब साशंकता निर्माण करणारी आहे. सदरच्या गैरकृत्याकरीता फिलिंग पॉईंटचे संबंधित कर्मचारी व मे. केंमट्रोलस् इंडस्ट्रिज लि. ही कंपनी संयुक्तरीत्या जबाबदार असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सदर गुन्हा नोंद प्रकरणी मे. आय.ओ.सी. या तेल कंपनीचे सिनियर टर्मिनल मॅनेजर पासुन थेट फिलिंग पॉईंटवरील कर्मचाऱ्यांपर्यंत कोणीही अतिरिक्त साठ्याची जबाबदारी स्विकारण्यास तयार नाही. संबंधित अधिकारी व कर्मचारी हे घटनास्थळी मोजदाद केल्यानंतर अतिरिक्त आढळुन आलेला साठा हा बदलत्या तापमानाची सबब सांगुन अथवा स्वयंचलित यंत्रांची सबब सांगुन अतिरिक्त आढळुन आलेल्या साठ्याची बाब स्विकारण्यास तयार नसल्याचे दिसुन येते. यावरुन मे. आय.ओ.सी. वाशी टर्मिनसचे सिनियर टर्मिनल मॅनेजर तसेच फिलिंग पॉईंटवरील कर्मचारी यांनी मोघम स्वरुपाची

निवेदने सादर करुन या कार्यालयाची पर्यायाने शासनाची दिशाभूल केल्याचे दिसुन येते. सदर प्रकरणी वाहतुकदारासोबत टँकरचा करारनामा करीत असताना सिनियर टर्मिनल मॅनेजर यांनी अत्यंत बेजबाबदारपणे नादुरुस्त असलेले अथवा गळती होत असलेले टँकर करारबद्ध केले असल्याचे दिसुन येते. सदर बाब अत्यंत गंभीर असुन कंपनीशी करारबद्ध असलेले टँकर हे पेट्रोलियम पदार्थ भरुन वितरणासाठी मार्गस्थ झाल्यानंतर अशाप्रकारे टँकरमधुन ज्वलनशील पदार्थाची गळती होत असताना काही अनुचित प्रकार घडल्यास मोठ्या प्रमाणावर जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तपासी पोलिस अधिकारी यांनी सादर केलेल्या अभिवेदनात जप्त सहा टँकर्समधील साठ्याची गळती होत असल्याची बाब त्यांनी या कार्यालयास वेळोवेळी अवगत केली आहे. मे. आय.ओ.सी. या तेल कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या मागणीनुसार तपासी पोलिस अधिकारी यांनी वैधमापनशास्त्र विभागाचे अधिकाऱ्यांमार्फत सहा टॅकर्समधील साठ्याचे पुन्हा मोजदाद केले असता सदर जप्त सहा टॅकर्समधुन दिनांक २४/११/२०१२ पासुन पुर्नमोजदाद केलेल्या तारखेपर्यंत म्हणजेच सुमारे दिड ते दोन महिन्याच्या कालावधीत नमूद सहाही टँकर्समधुन डिझेल साठ्याची गळती झाल्याचे सिद्ध झाले असतानाही पुर्नमोजदादचेवेळी जप्त करण्यात आलेल्या टँकर मधील प्रत्येकी एक कप्प्यामध्ये अतिरिक्त डिझेलचा साठा असल्याचे निष्पन्न झाले आहे. यावरुन सिनियर टर्मिनल मॅनेजर हर्षवर्धन गुप्ता यांनी फिलिंग पॉईंटवरील संबंधित सर्व कर्मचाऱ्यांशी संगनमत करुन त्यांच्या ताब्यातील कंपनीच्या मालकीचा तसेच पर्यायाने केंद्र शासनाच्या मालकीचा डिझेलचा अनुदानीत साठा हा वाहतुकदार अथवा टँकरचे चालक यांनी मागणी केल्यानुसार त्यांना गैरमार्गाने डिझेलचा अतिरिक्त साठा ची अवैधरित्या विक्री करीत असल्याचे सिद्ध झाले आहे. सबब, जप्त करण्यात आलेल्या सहा टँकर्स मधील संपूर्ण डिझेल व पेट्रोलचा साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सदर गुन्हयातील जप्त टँकर क्र. एमएच-०४-बीयु-९३६५, एमएच-४३-ई-५७९४, एमएच-०४-सीए-५७०७, एमएच-४६-एफ-७७८६, एमएच-०४-एएल-३२५४ व एमएच-४३-ई-५८२१ या सहा टँकरचे मालक तथा वाहतूकदार यांनी सुनावणीचे वेळी केलेल्या खुलाश्यात सदर टँकर मालकांचा आय.ओ.सी. या कंपनीसोबत करारनामा असुन ते प्रामाणिकपणे काम करीत आहे. आय.ओ.सी. कंपनी वाशी टर्मिनल येथील चलनानुसार साठा भरुन मिळाल्यानंतर चलनावरील नमूद ठिकाणी वितरण केले जाते. प्रचलित पद्धतीनुसार त्यांचे टँकर हे आय.ओ.सी. कंपनीच्या बाहेर उभे केले जात असुन कंपनीतुन हाक दिल्यानंतर टँकर भरण्यासाठी कंपनीत प्रवेश करीत असतात. प्रवेश केल्यानंतर टँकर हा फिलिंग पॉईंट येथे जात असुन त्याठिकाणी संपूर्णरित्या स्वयंचलित यंत्रणा असुन त्याद्वारे पेट्रोलियम पदार्थाची चलानानुसार भरणा केली जात आहे. सदर फिलिंग पॉईंटवर कोणत्याही माणसाचा साठा भरण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभाग नसुन टँकरमध्ये साठा भरल्यानंतर ते तात्काळ लॉक होत असुन तद्नंतर कंपनीचे प्रतिनिधी त्यास सिलबंद करुन टँकर चालकाच्या हाती चलन देवुन तो उपभोक्त्यास वितरणासाठी

पाठविला जातो. कंपनीच्या पद्धतीनुसार तापमानात वाढ झाल्यानंतर साठ्यात वाढ होते आणि तापमान घसरल्यानंतर साठा कमी होतो. तपासणीचे दिवशी टँकर भरल्यानंतर त्यांचे टँकर ताब्यात घेण्यात आले आणि दुपारच्या सुमारास डिप रॉडद्वारे त्यामधील साठ्याची मोजदाद करण्यात आली. त्यामुळे नैसर्गिकरित्या तापमानात वाढ झाल्यामुळे साठ्यामध्ये अधिकचा फरक दिसुन आला. टँकरमधील अतिरिक्त साठा हा काळ्याबाजाराने विक्री करीत असल्याची बाब पुराव्यानिशी सिद्ध होत नाही असे सांगितले आहे.

तथापी, उपरोक्त सहा टँकरचे चालक यांनी घटनास्थळी पंचांसमक्ष दिलेल्या जबाबात त्यांनी सदरचा अतिरिक्त डिझेलचा साठा त्यांच्या टँकरमध्ये भरुन मिळण्यासाठी त्यांनी आय.ओ.सी. या कंपनीच्या फिलिंग पॉईंटवर प्रत्यक्षात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोबदला म्हणुन रक्कम अदा केल्याचे कबुल केले आहे. संबंधित तेल कंपनीने केलेल्या मागणीनुसार पोलिसांनी जप्त टँकरमधील डिझेल साठ्याची वैधमापनशास्त्र विभागाकडून पुन्हा मोजदाद करुन घेतली असता जप्त टँकरच्या अतिरिक्त आढळुन आलेल्या कप्प्यांमधील साठ्याचे फेरमोजणीमध्ये अतिरिक्त डिझेलचा साठा आढळुन आल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे नमूद तेल कंपनीकडून ठराविक टँकर मालक तथा वाहतूकदारांना त्यांचे टँकरमध्ये बऱ्याच कालावधीपासुन अतिरिक्त डिझेलचा साठा भरुन दिल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे. सबब, टँकर मालकांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व या कार्यालयाची दिशाभूल करणारे असल्याचे दिसुन येते.

सदर गुन्हा नोंद प्रकरणी आय.ओ.सी. या तेल कंपनीचे वितरणाशी संबंधित अधिकारी व कर्मचारी हे टँकरचे मालक तथा वाहतूकदार तसेच त्यांचे चालक यांचेशी संगनमत करुन कंपनीतील डिझेलचा साठा हा चलनापेक्षा अतिरिक्त भरुन तो गैरमार्गाने विक्री करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सदर गैरप्रवृत्तीस आळा घालण्याची जबाबदारी टँकरचे मालक अथवा वाहतुकदाराची आहे. सदर गुन्हा नोंद प्रकरणी टँकरचे मालक अथवा वाहतुकदार यांनी त्यांचा या गैरप्रवृत्तीशी काहीही संबंध नसल्याचे सांगुन त्यांनी या कार्यालयाची दिशाभूल करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसून येते. नमुद टँकरमधील भरण्यात आलेला डिझेल व पेट्रोलचा साठा हा नियोजीत ठिकाणी व जसाच तसा वितरण करण्याची जबाबदारी वाहतुकदार व टँकरचे मालक यांची आहे. परंतु, या कार्यालयाच्या फिरते पथकामार्फत यापुर्वी टाकण्यात आलेल्या धाडींमध्ये सदर तेल कंपनीतुन भरुन निघालेले टँकरचे चालक हे कंपनीतुन बाहेर पडल्यानंतर टँकरमधील अतिरिक्त भरुन मिळालेला डिझेलचा साठा हा बेकायदेशिररीत्या काढत असताना संबंधित टँकरच्या चालकांना रंगेहात पकडले आहे. प्रस्तुत प्रकरणी, जप्त करण्यात आलेल्या सहा टँकर मालकांच्या अपरोक्ष जरी चालक यांनी त्यांचे वाहनांचा गैरवापर केला असला तरी वाहन मालक

या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनांचा गैरवापर होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर टँकरच्या बाजारमुल्या एवढी प्रत्येकी संपुर्ण रक्कम भरण्यास टँकरचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरचे टँकर त्यांच्या मालकास परत करण्याचा अथवा टँकरचे मालक तेवढी प्रत्येकी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरचे टँकर जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६- अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०४३/२०१२, दिनांक २५/११/२०१२ अन्वये गुन्हा नोंद मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) प्रस्तूत प्रकरणी, टँकर क्र. एमएच-०४-बीयु-९३६५, एमएच-४३-ई-५७९४, एमएच-०४-सीए-५७०७, एमएच-४६-एफ-७७८६, एमएच-०४-एएल-३२५४ व एमएच-४३-ई-५८२१ या सहा टँकर मधील डिझेल व पेट्रोलचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

२) उपरोक्त शासनजमा करण्यात आलेला संपुर्ण डिझेल व पेट्रोलचा साठा हा पोलिसांनी, राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०, पी डिमेलो रोड, वाडीबंदर, मुंबई यांना प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) जप्त करण्यात आलेले टँकर क्र. एमएच-०४-बीयु-९३६५, एमएच-४३-ई-५७९४, एमएच-०४-सीए-५७०७, एमएच-४६-एफ-७७८६, एमएच-०४-एएल-३२५४ व एमएच-४३-ई-५८२१ ही वाहने शासनजमा करण्यात येत आहेत. सदर वाहनांच्या प्रत्येकी बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास वाहनांचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहने त्यांच्या मालकास परत करण्यात यावेत व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनांच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

४) अथवा वाहनांचे मालक सदरची प्रत्येकी रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरची वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

0026

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) विठ्ठल तुकाराम सावंत, ऑपरेशन ऑफीस ग्रेड २, आय.ओ.सी.
२) प्रविण जनार्दन धनू, ऑपरेशन ऑफीस ग्रेड ३, आय.ओ.सी.
३) कृष्णकुमार भिकाजी परब, ऑपरेटर फिड, आय.ओ.सी.
४) रामचंद्र गोविंद गवस, फोरमन, आय.ओ.सी.
५) एकनाथ पांडूरंग परब, ऑपरेटर फिड, आय.ओ.सी.
६) एल. जे. निर्भवणे, ऑपरेटर फिड, आय.ओ.सी.
७) बाळासाहेब जनार्दन आवारे, सेक्युरिटी सुपरवायझर, आय.ओ.सी.
८) सुर्यलाल बिहारीलाल यादव, टँकर क्र. एमएच-०४-बीयू-९३६५ टँकर मालक व चालक
९) टँकर क्र. एमएच-०४-बीयू-९३६५ चे वाहतुकदार
१०) रामवृक्ष सोमई मौर्या, टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ चा चालक
११) टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ चा मालक
१२) टँकर क्र. एमएच-४६-एफ-७७८६ चा वाहतुकदार
१३) सुरेशकुमार रामशरण यादव, टँकर क्र. एमएच ०४-एएल-३२५४ चा चालक
१४) टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ चा मालक
१५) टँकर क्र. एमएच-०४-एएल-३२५४ चा वाहतुकदार
१६) भोला महंगू गुप्ता, टँकर क्र. एमएच-०४-सीए-५७०७ चा चालक
१७) टँकर क्र. एमएच-०४-सीए-५७०७ चा मालक
१८) टँकर क्र. एमएच-०४-सीए-५७०७ चा वाहतुकदार
१९) टँकर क्र. एमएच-४३-ई-५८२१ चा चालक
२०) टँकर क्र. एमएच-४३-ई-५८२१ चा मालक
२१) टँकर क्र. एमएच-४३-ई-५८२१ चा वाहतुकदार
२२) टँकर क्र. एमएच-४३-ई-५७९४ चा चालक
२३) टँकर क्र. एमएच-४३-ई-५७९४ चा मालक
२४) टँकर क्र. एमएच-४३-ई-५७९४ चा वाहतुकदार

२५) श्री. आर. निलकंटन, डेप्युटी मॅनेजर, आय.ओ.सी.

२६) श्री. हर्षवर्धन गुप्ता, सिनियर टर्मीनल मॅनेजर, आय.ओ.सी.

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२. राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १० पी डिमेलो रोड, वाडी बंदर, मुंबई-४०० ०१० (दुरध्वनी क्र. ०२२-३७५८१३०) यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

३. श्री. एस.एस. बोस, डी.जी.एम. (ऑपरेशन्स), आय.ओ.सी., मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

४. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

५. कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.

६. निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

0028